**नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१९**
**पुष्पा/यादवराव**
**निशाणी क्र.२८**

**अर्ज नि.क्र.४३ वरील आदेशानुसार वादी तर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन वादी पुष्पा लिलाधर बारमासे यांची पुढील सरतपासणी वादीचे अधिवक्ता श्री.एम.पी.तिवारी यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

२३. मी माझ्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२८ वर दाखल केले असुन मला माझ्या अधिवक्तयांनी ते वाचुन व समजुन सांगितले आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेला आहे. मी त्यावर वाचुन व समजुन सही केली आहे.

२४. मी दावा दाखल करण्याआगोदर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दिनांक २३.०४.२०१९ रोजी अधिवक्ता श्री.एस.टी.क्षिरसागर यांच्यामार्फत वाद संपत्तीच्या हिस्सेवाटणीची नोटीस नोंदणीकृत पोस्टाव्दारे पाठविली होती. आता मला सदर नोटीसची स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर अधिवक्ता श्री.एस.टी.क्षिरसागर यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसला **नि.क्र.४६** देण्यात येते. सदर नोटीस पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाच्या ४ मुळ पावत्या अभिलेखावर दाखल असुन त्यांना **नि.क्र.४७** ते **नि.क्र.५०** देण्यात येते. सदर नोटीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना मिळाल्याबाबत पोस्टाच्या ४ मुळ पावत्या अभिलेखावर दाखल असुन त्यांना **नि.क्र.५१** ते **नि.क्र.५४** देण्यात येते.

**सरतपास संपला**

**प्रतिवादींचे अधिवक्ता श्री.एस.एम.नाफडे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले

समक्ष

(पी. आर. पाटील)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक–०५.०८.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– अ.य.कुळकर्णी